# भारतीय वृत्तपत्रसृष्टीची वाटचाल

**श्रीमती स्मिता अशोक पाटील,** संशोधक विद्यार्थी, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर .

......................................................................................................................

**प्रस्तावना ः**

वृत्तपत्रांचा इतिहास सुमारे दोन–अडीचशे वर्षांचा आहे. जगातील पहिले वृत्तपत्र सोळाव्या शतकात निघाले. भारतात इंग्रजांनी प्रथम ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून कलकत्यात जम बसविला. व्यापाराच्या माध्यमातून त्या ठिकाणी इंग्रज नागरीक व अधिकारी यांचा वावर सुरू झाला. त्यामुळे साहजिकच देशात पहिले वृत्तपत्र चालू केले ते ईस्ट इंडिया कंपनीचा कर्मचारी जेम्स ऑगस्टस हिकी याने. २९ जानेवारी १७८० रोजी 'बंगाल गॅझेट' नावाने त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. 'हिकीचे पहिले गॅझेट' म्हणूनही ते परिचित आहे. साप्ताहिक असणारे हिकी गॅझेट हे १२ × ८ इंचाचे दोन पानी होते. त्यावेळी वॉरन हेस्टिंग्ज हे गव्हर्नर जनरल होते. त्यांच्यावर या गॅझेटमधून टीका होवू लागली. वॉरन हेस्टिंग्ज यांनी त्यावर बदनामीचे खटले दाखल केले. हिकीला तुरूंगवास भोगावा लागला. शेवटी २६ महिन्यामध्येच या गॅझेटचा कारभार गुंडाळला गेला.

१७८४ च्या सुमारास कलकत्ता गॅझेट सरकारच्या पाठिंब्याने सुरू झाले. त्यापुढच्या वर्षी थॉमस जोन्स यांनी 'बेंगाल जर्नल' काढले. थॉमस जोन्स यांनी सरकारच्या जाहिराती फुकट छापण्याचे ठरवून सवलती मिळवल्या होत्या. मद्रासमध्ये १२ ऑक्टोबर १७८५ ला 'मद्रास क्युरीअर' सुरू झाले. रिचर्ड जॉन्स्टन हे त्याचे संस्थापक होते. त्यानंतर मद्रास गॅझेट इंडिया हेरॉल्ड निघाले.

मुंबईत पहिले वृत्तपत्र १७८९ मध्ये 'बॉम्बे हेरॉल्ड' सुरू झाले. हे साप्ताहिक होते. ते १७९० मध्ये 'बॉम्बे गॅझेट'मध्ये समाविष्ट झाले. त्याद्वारे ते सरकारी प्रकाशन बनले.

भारतीय वृत्तपत्रसृष्टीचे जनक राजा राममोहन रॉय यांच्या प्रेरणेने कलकत्यात पहिले भारतीय वृत्तपत्र 'द बेंगॉल गॅझेट' १८१६ मध्ये सुरू झाले. श्री गंगाधर भट्टाचारजी हे त्याचे संपादक होते. ते चार वर्षे चालू होते.

राजा राममोहन रॉय यांनी डिसेंबर १८२१ मध्ये 'संवाद कौमुदी' नावाचे बंगाली भाषेतील दैनिक सुरू केले. बंगालमध्ये मुस्लिम राजवट प्रस्थापित झाल्यापासून तेथे हळूहळू पार्शियन भाषेचा वापर सुरू झाला होता. ज्यांना बंगाली किंवा इंग्रजी येत नव्हते त्यांच्यासाठी रॉय यांनी 'मीरज–उल–अखबार' नावाचे पर्शियन साप्ताहिक सुरू केले. दरम्यान बंगाल (श्रीरामपूर) येथील मिशनरी मंडळींच्या अपप्रचाराला उत्तर देण्यासाठी रॉय यांनी 'ब्रॅह्मॅनिकल मॅगेझिन' नावाचे नियतकालिक सुरू केले हे द्विभाषिक पत्र होते. एका पानावर बंगाली भाषेत मजकूर असे व दुसऱ्या पानावर त्याचेच इंग्रजी भाषांतर असे.

वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी राजा राम मोहनरॉय यांनी त्या काळात धडपड केली. निद्रिस्त हिंदू समाजाला जागे करून सुधारणा स्वीकारण्यास लावण्याचे श्रेय राजा राममोहन रॉय यांच्या वृत्तपत्राला आहे. विशेषत: सतीच्या चाली विरोधात या वृत्तपत्राने लोकमत तयार केले. पुढे १८२९ मध्ये लॉर्ड विल्यम बेंटिग यांनी सतीची चाल कायद्याने बंद केली.

गव्हर्नर जनरल जॉन ॲडम यांनी वटहुकुम काढून वृत्तपत्र काढणे, छापखान्याचा वापर करणे यासाठी परवानगी मिळविणे सक्तीचे केले. ह्याचा परिणाम होवून राजा राममोहन रॉय यांची वृत्तपत्रे बंद पडली. पुढे लॉर्ड विल्यम बेंटिग गव्हर्नर जनरल म्हणून आल्यानंतर वृत्तपत्र विषयक निर्बंधात पुष्कळशी शिथिलता आली. वृत्तपत्र हे चांगल्या शासनाचे मित्र व सल्लागार होय असे स्पष्ट जाहीर करून त्याने उदार दृष्टिकोन स्वीकारला. त्यामुळे वृत्तपत्रसृष्टीला पुन्हा भरभराटीचे दिवस आले. १८२९ मध्ये 'बेंगॉल हेरल्ड'ची स्थापना राजा राममोहन रॉय यांनी केली. 'बंगदूत' ही त्यांचीच बंगाली, पर्शियन व देवनागरी लिपितील आवृत्ती निघू लागली.

बंगालच्या अनुकरणाने मुंबईत वृत्तपत्रविषयक हालचाल सुरू झाली. मुंबईत मराठी वृत्तपत्राचा जन्म होण्यापूर्वी दहा वर्षे अगोदर गुजराती वृत्तपत्र सुरू झाले. ९ जुलै १८२२ मध्ये 'मुंबईना समाचार' या नावाने देशातील पहिले गुजराती वृत्तपत्र सुरू करण्याचा मान पारशी गृहस्थ फर्दुनजी मर्झबान यांच्याकडे जातो. स्वदेशीयांमध्ये विलायती विद्येचा अभ्यास व्हावा व या देशाची समृद्धी, एतद्देशीयांचे कल्याण याविषयी स्वतंत्रतेने व उघड रीतीने विचार करावयास स्थळ व्हावे' या हेतूने वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी विद्वान तरूण बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ पासून 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले. दर्पण हे प्रथम पाक्षिक होते. त्यानंतर चार महिन्यात त्यांनी त्याचे साप्ताहिकात रूपांतर केले. 'दर्पण' हा मराठीतील पहिलाच प्रयोग. निम्मा मजकूर इंग्रजी, निम्मा मराठी असे त्याचे द्वैभाषिक स्वरूप होते. ६ जानेवारी १८३२ ला निघालेले हे वृत्तपत्र २६ जून १८४० रोजी साडेआठ वर्षांनी बंद झाले. मात्र या अवधीत मराठीतील वृत्तपत्र सृष्टीची मुहूर्तमेढ रोवली गेली.

१८३५ ते १८५५ पर्यंतच्या काळात छापखाने व वृत्तपत्रे यांचा सर्रास वापर होत गेला. ज्ञानप्रसार, इंग्रजी विद्येचा प्रसार, प्रतिपक्षीयांवर टीका अशा प्रकारचा मजकूर या वृत्तपत्रामधून येत असे. सामाजिक, धार्मिक, राजकीय या विषयाबरोबरच

धुमकेतू, ग्रह, तारे, सत्य बोलण्याचे महत्त्व वगैरेसारख्या विषयावर लेख येत असत. तत्कालीन समाजाचे चित्रही या नियतकालिकातून काहीसे दिसून येते. लोकामध्ये सर्वांगीण जागृती करणे व आलेल्या परक्या संस्कृतीशी एतद्देशीयांचे योग्य समायोजन साधने हे कार्य या नियतकालिकांनी बजाविले. त्यात भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर', 'ज्ञानोदय' या वृत्तपत्रांचा यामध्ये समावेश करावा लागेल.

पुण्यात 'मित्रोदय' या वृत्तपत्राने वृत्तपत्रांचा प्रारंभ झाला. त्यानंतर 'प्रभाकर' या वृत्तपत्राचा प्रारंभ २४ ऑक्टोबर १८४१ रोजी झाला. हे वृत्तपत्र गोविंद विठ्ठल महाजन तथा भाऊ महाजन यांनी चालू केले. 'प्रभाकर'मध्ये १९ मार्च १८४८ रोजी लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांचे शतपत्रातील पहिले पत्र प्रसिद्ध झाले. तो महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा पहिला प्रयत्न म्हणता येईल.

१२ फेब्रुवारी १८४९ पासून 'ज्ञानप्रकाश' हे वृत्तपत्र सुरू झाले. कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी सुरू केलेले हे वृत्तपत्र पुण्याचा एक अविभाज्य भाग बनले. ते मराठीतील जवळपास १०३ वर्षे चाललेले पहिले वृत्तपत्र आहे. त्याचा शेवटचा अंक ३१ डिसेंबर १९५० रोजी प्रकाशित झाला. प्रथम साप्ताहिक असलेला ज्ञानप्रकाश १८५३ मध्ये द्विसाप्ताहिक झाला आणि १९०४ मध्ये तो दैनिक झाला. मुंबई-पुण्याबरोबरच अहमदनगर, सातारा, रत्नागिरी, जमखंडी, नाशिक यासारख्या ठिकाणीही वृत्तपत्रे निघू लागली. १८५० च्या काळात मुंबई प्रांतात ६२, बंगालमध्ये ५०, मद्रासमध्ये १९ नियतकालिके होती. १८५७ च्या धामधुमीमुळे वृत्तपत्रावर कडक नियंत्रण आले.

२८ सप्टेंबर १८६१ ला 'टाईम्स ऑफ इंडिया'चा पहिला अंक निघाला. रॉबर्ट नीट हे त्याचे संपादक होते. १८९५ ला अलाहाबादला 'पायोनियर'ची स्थापना झाली. मार्च १८६८ ला कलकत्याजवळ 'अमृत बझार पत्रिका' निघू लागली. ही पत्रके दर्जेदार म्हणून भारतभर ओळखली जातात.

ज्ञानप्रकाश पाठोपाठ महाराष्ट्राने पाहिलेले दुसरे महत्त्वपूर्ण वृत्तपत्र म्हणजे 'केसरी'. केसरी म्हणजे वनराज अर्थात गर्जना करणे. ४ जानेवारी १८८१ ला लोकमान्य टिळक यांनी गो. ग. आगरकर व विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या मदतीने 'केसरी' काढला. ही खरोखरीच स्वातंत्र्याच्या संग्रामात सिंहगर्जना ठरली. लोकजागृती व सरकारच्या विरूद्ध प्रचार ही केसरीची वैशिष्ट्ये होती. कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणामुळे टिळकांना तुरूंगवास भोगावा लागला. वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी भोगावा लागलेला हा पहिलाच तुरूंगवास म्हटला पाहिजे.

१५ ऑगस्ट १८८८ पासून 'सुधारक' निघाले. गोपाळ गणेश आगरकरांनी सामाजिक सुधारणेचा प्रचार त्यातून केला. आणि अशा प्रकारे समाजात केसरीतून राजकीय जागृती तर सुधारकाद्वारे सामाजिक जागृती घडून येत होती. वृत्तपत्रसृष्टीत याच काळात २५ ऑक्टोबर १८९९ ला 'करमणूक' नावाचे नियतकालिक चालू करून उत्कृष्ट मनोरंजनासाठीही वृत्तपत्र असू शकते हे ह. ना. आपटे यांनी दाखवून दिले. याच दरम्यान समाजाला स्वातंत्र्यप्रवण बनविणारे लिखाण शिवराम महादेव परांजपे यांच्या लेखनीतून 'काळ' या वृत्तपत्रातून प्रकट झाले. त्यांनी २५ मार्च १८९८ ला 'काळ' हे गाजलेले वृत्तपत्र काढले. १९२० पर्यंतच्या कालखंडात वृत्तपत्रसृष्टीची वैचारिक बाजू अधिक सधन होत गेली. अनेक सामाजिक व राजकीय वादविवाद वृत्तपत्रातून रंगविले गेले व वाचकानीही ते हौसेने वाचल्याचे दिसते. राजकारणाच्या क्षितीजावर म. गांधींचा उदय झाल्यानंतर तर वृत्तपत्रसृष्टीत एक नवे युग सुरू झाले. म. गांधीनी 'हरिजन' आणि 'यंग इंडिया' काढून वृत्तपत्रसुष्टीला नवे वळण दिले. संयमाने पण परिणामकारक लेखन कसे करावे याचा वस्तुपाठ त्यांनी दिला.

मराठी वृत्तपत्रांचा उदय ६ जानेवारी १८३२ पासून झाला. त्यानंतर ८८ वर्षांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांचे मुखपत्र सुरू केले. या काळात दलित समाजाचे स्वत:चे स्वतंत्र वृत्तपत्र नव्हते. ३१ जानेवारी १९२० हा क्रांतीच्या पत्रकारितेत, देशाच्या पत्रकारितेत सामाजिक क्रांतीच्या पत्रकारितेचा प्रारंभ म्हणून नोंदवला गेलेला आहे. यादिवशी 'मूकनायक' हे वृत्तपत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केले. त्याच्या मागचा आर्थिक आधार राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते. 'जगात मुक्यांचा आवाज नाही त्यांचा कोणीच वाली नसतो. अशा स्थितीत भीड धरून, लाज बाळगून हित होणार नाही. आपला आवाज आपणच बुलंद करायला हवा, नि:शंकतेने हे काम करायला हवे' अशा संत तुकारामांच्या अभंगाची निवड करून मूकनायकचे ध्येय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले. डॉ. आंबेडकर इंग्लंडला पुढील शिक्षणासाठी गेल्याने ८ एप्रिल १९२३ रोजी 'मूकनायक' बंद पडले. त्यानंतर ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत'चा पहिला अंक निघाला आणि १५ नोव्हेंबर १९२९ ला शेवटचा अंक काढून 'बहिष्कृत भारत' बंद पडले. या दरम्यान ४ सप्टेंबर १९२७ रोजी 'समता' वृत्तपत्राचा प्रारंभ झाला. 'समता' व 'बहिष्कृत भारत' आळीपाळीने दर आठवड्याला प्रसिद्ध करण्याचा निर्णय झाला. 'बहिष्कृत भारत' बंद झाल्यावर 'समता' पुढे चालू होते. त्यानंतर २४ नोव्हेंबर १९३० पासून 'जनता' हे पत्र प्रसिद्ध होवू लागले. त्याचे ४ फेब्रुवारी १९५६ रोजी 'प्रबुद्ध भारत'मध्ये रूपांतर झाले. डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'समता', 'जनता'

व 'प्रबुद्ध भारत' ही जी पाच दमदार पावले टाकली ती वेगळ्या पातळीवरची पत्रकारिता होती. स्वतंत्र बाण्याचे धारदार आणि तर्कशुद्ध लिखाण हे त्याचे वैशिष्ट्य आहे. अन्याय वेशीवर टांगीत, न्याय प्रस्थापित करण्यासाठी समाज पुरूषाला खडबडून जाग आणण्याकरिता त्यांनी नेत्रदीपक संघर्ष केला.

वृत्तपत्रांचे आजचे स्वरूप खूप बदलले आहे. पुढेही बदलत राहील. बदल वृत्तपत्रांचा आत्मा आहे. दैनिकाच्या बातम्यांच्या पानांना धरून विविध विषयावरील पुरवण्या ही आत्ताची सार्वत्रिक रीत आहे. पूर्वीपेक्षा पानांची संख्या वाढली. वितरण जलद गतीने होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, रंगीत छपाई, बातम्यांची संख्या, गती, ताजेपणा वाढला. वृत्तपत्रांची रचना आणि कागदाचा आकारही बदलत गेला. त्यांची संख्या, प्रकार, विषय, बातमीविषयक दृष्टिकोन, प्रचंड स्पर्धा यातून वृत्तपत्रसृष्टीचा वटवृक्ष बहरला आहे. आज वृत्तपत्राचे स्वरूप बघता काही दैनिके सकाळी प्रसिद्ध होतात तर काही सायंकाळी. सकाळ, केसरी, लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, ऐक्य, पुढारी, तरूण भारत, गावकरी अशी वृत्तपत्रे मोठ्या आकाराची आहेत. स्थानिक, शहर वृत्तपत्र, जिल्हा, प्रादेशिक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रे प्रसिद्ध होवू लागली आहेत. समाजमनावर विचार जागृतीची बीजे पेरण्याचे कार्य वृत्तपत्रे करीत आहेत.

स्वातंत्र्योत्तर लोकशिक्षण आणि लोकजागृती करीत असताना व्यक्ती, संस्था अथवा पक्ष यांची प्रतिमा तयार करण्याचे कार्य वृत्तपत्रे करू लागली. पूर्वी वृत्तपत्रे ही मतपत्रे होती. आता वृत्त देतानाच वृत्तपत्राचा दृष्टिकोन, विचार प्रकट होताना दिसतात.

भारतीय वृत्तपत्रात १९६० ते १९७० नंतरच्या काळात बराच बदल झाल्याचे लक्षात येते. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात व नंतरही काही काळ राजकारण आणि राजकीय घडामोडी म्हणजेच बातमी असा समज होता. परंतू राजकारणाशिवाय व राजकीय बातम्याशिवाय जीवनाच्या इतर अंगाविषयीही वृत्तपत्रातून मजकूर देता येतो ही कल्पना विकसित झाली आणि म्हणूनच विविध विषयाचे ज्ञान, विज्ञानाबरोबरच विविध क्षेत्रातील अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम वृत्तपत्र करू लागले.

तंत्रज्ञानातील वेगवान बदलांमुळे आपल्याला आता माहिती प्रसारासाठी थांबून रहावे लागणार नाही. क्षणाक्षणाला नवी माहिती देणारे इंटरनेटसारखे पूर्णपणे संगणकाचे माध्यम जगात वेगाने पसरले आहे. या माध्यमाच्या मदतीने आपल्या रोजच्या कामाला २४ तास घेणारी वृत्तपत्रे तासागणिक जन्म घेत आहेत. जगभराच्या ताज्या घडामोडी तत्परतेने ती सादर करीत आहेत. त्यामुळे आता निरंतर वृत्तपत्राची अथवा 'ऑन लाईन' वृत्तपत्राची नवी संकल्पना अस्तित्वात आली आहे. दैनिके इंटरनेटवर उपलब्ध झाली. याचा अर्थ दैनिकाची 'ऑनलाईन आवृत्ती' सुरू झाली. एरवी आपले कागदावर छापले जाणारे दैनिक सकाळी हातात पडून वाचले जाताच शिळेही होऊन जाते. ऑनलाईन दैनिकाचे तसे नाही त्यात सतत माहिती 'अपडेट' केली जात असते. म्हणजे अधिकाधिक ताजी, नवी माहिती तेथे हजर असते. टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्स्प्रेस, हिंदुस्थान टाईम्स, दैनिक भास्कर, लोकमत, बिझनेस वर्ल्ड, दैनिक जागरण, डेक्कन हेरॉल्ड, गुजरात समाचार अशी काही भारतीय दैनिके ऑनलाईन उपलब्ध आहेत त्यांची उदाहरणे देता येतील. त्यांच्या या आवृत्तीत ठराविक तासांनी माहितीचे 'अपडेटिंग' केले जाते.

'वर्ल्ड वाईड वेब' अर्थात www अशा अद्याक्षरांनी सर्व दैनिकांचे पत्ते अथवा वेबसाईट सुरू होते. उदाहरणार्थ 'लोकमत'च्या ऑनलाईन आवृत्तीचा पत्ता www.lokmat.com असा आहे. www या अद्याक्षरांनी तयार होत असलेल्या शब्दाचा अर्थ 'विश्वव्यापी महाजाल' असा आपल्याला करता येईल. हे महाजाल माहिती व ज्ञानाचा एक महासागर आहे. इंटरनेटच्या मदतीने आपण जगातील हवे ते दैनिक वाचू शकतो. आपल्यासाठी ज्ञानप्राप्तीचे हे एक प्रचंड असे महाद्वार उघडले आहे. वृत्तपत्रे म्हणजे बदलत्या जीवनाचे प्रतिबिंब दाखविणारा जणू आरसाच आहे. नवे विचार, संस्कृती, जागरण, नवनिर्मिती यांचे सातत्य टिकविण्यासाठी वृत्तपत्रांचे कार्य अतुलनीय असे आहे. बदलत्या जीवनाचा दर्शक असलेल्या विचारांना वृत्तपत्रानींच बोलके केले आहे.